# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र.९३** **दिनांक:- १२/०४/२०२१**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील "कोविड-१९" कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना N-95 मास्क वाटप.**

कोविड च्या दुसऱ्या लाटेच्या दृष्टीने "फ्रंन्टलाईन वर्कर" म्हणुन पोलीस दलाची भुमिका अतिशय महत्वाची असते. शासनाच्या "Break the chain" निकष यशस्वीपणे राबविण्यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार हे सातत्याने प्रयत्न करीत आहेत. कोवीड काळात पोलीस दलातील सर्व अधिकारी व अंमलदार यांची सुरक्षा देखील अतिशय महत्वाची आहे.

आयुक्तालयातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसाठी देखील N-95 मास्क उपलब्ध करण्याचा श्री. सदानंद दाते पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचा संकल्प होता, त्यास प्रतिसाद देऊन श्री. विलेपार्ले केलवानी मंडळ (S.K.V.M.) चे विश्वस्त श्री. जगत किल्लावाला व श्री. भार्गव पटेल यांनी दहा हजार (१०,०००) N-95 मास्क पोलीसांसाठी उपलब्ध करुन दिले आहेत.

सदर N-95 मास्क हे कोविड काळातील महत्वाचे संरक्षण म्हणून आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे व सर्व शाखा अधिकारी व अंमलदार यांना वाटप करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner